॥ या विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड - ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

## ACADEMIC (APPROVAL) SECTION

Phone: (02462) 229242
FAX No. (02462) 229574

website: srtmun.ac.in
E-mail:approvalsrtmun@gmail.com

## परिपत्रक

परिपत्रक जा.क्र. शैक्षणिक/मान्यता/कॅस/०२/२०२२—२३/७४९, दि.२४/११/२०२२

प्रस्तुत विद्यापीठाशी संलग्नित सर्व अशासकीय अनुदानित महाविद्यालयांच्या मा.प्राचार्यांना या परिपत्रकान्वये कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयातील सहाय्यक प्राध्यापकांना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार Stage I to II (Academic Level –11, AGP-7000) व Stage II to III (Academic Level–12, AGP-8000) करीता सेवांतर्गत प्रगती योजना (Career Advancement Scheme-CAS) अंतर्गत स्थाननिश्चिती/पदोन्नतीकरीता खालील जिल्हानिहाय केंद्रांवरती Screening Committee बैठकीचे आयोजन करण्यात आलेले आहे. त्यामुळे दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ पर्यंत पात्र होणारे सहाय्यक प्राध्यापकांचे प्रस्ताव जिल्हानिहाय केंद्रावरती दि. २८/०२/२०२३ पर्यंत सादर करावीत असे संदर्भीय परिपत्रकान्वये कळविण्यात आलेले आहे.

**जिल्हानिहाय कॅस कॅम्प — २०२२—२३**

| अनु.क्र. | जिल्हा | केंद्राचे नांव |
|---|---|---|
| १ | नांदेड | विज्ञान महाविद्यालय, स्नेहनगर, नांदेड |
| २ | परभणी व हिंगोली | बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी |
| ३ | लातूर | राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर |

संबंधीत कॅस कॅम्प केंद्रानी विनंती केल्यानुसार दिनांक ०४/०१/२०२३ रोजी झालेल्या मा.व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत विषय क्र.०६/८६—२०२३ नुसार खालीलप्रमाणे ठराव पारीत करण्यात आलेला आहे.

**ठराव — जिल्हानिहाय कॅस कॅम्प अंतर्गत पदोन्नती/स्थाननिश्चिती बैठकीचे आयोजन करण्यासाठी प्रत्येक प्रकरण / प्रत्येक Stage करीता रू.२,५००/— शुल्क आकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात येते.**

सर्व संलग्नीत महाविद्यालयातील पात्र शिक्षकांचे स्थाननिश्चिती/पदोन्नतीचे प्रस्ताव जिल्हा निहाय केंद्रावर सादर करण्यापूर्वी, संबंधीत महाविद्यालयांनी कार्यरत शिक्षकांना UGC Regulation 2018 प्रमाणे विविध स्तरावरील पात्रतेचे निकष पूर्ण करणा—या विद्यापीठ मान्यता प्राप्त शिक्षकांनी स्थाननिश्चिती (कॅस) चे प्रस्ताव महाविद्यालयातील IQAC कक्षाकडून योग्य ती छाननी/तपासणी

कृ.मागे पहा...

करून पात्र असल्याचा स्वतंत्र अहवाल प्राचार्यांकडे द्यावा. प्राचार्यांनी सदरील अहवालाची प्रत, महाविद्यालयाच्या कव्हरींग लेटरसह प्रस्तावाच्या चार प्रती प्रत्येक प्रकरण / प्रत्येक Stage करीता रू.२,५००/– शुल्क भरणाकरून जिल्हा निहाय केंद्रावरती सादर करावीत. संबंधीत जिल्हानिहाय केंद्रानी प्राप्त प्रस्तावाची छाननी (Scrutiny) करावी. विषय तज्ज्ञांच्या नामनिर्देशनासाठी प्रस्तुत विद्यापीठात पात्र शिक्षकांची विषयनिहाय यादी सादर करावी. त्यानंतर संबंधित जिल्हानिहाय केंद्रानी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विनियमानुसार कॅम्पच्या आयोजनाची तारीख निश्चित करून संबंधितांना कळवावे.

तसेच विद्यापीठ अनुदान आयोग विनियमानुसार CAS अंतर्गत पात्र शिक्षकांचे पदोन्नती/स्थाननिश्चिती सदरील प्रस्तावाची छाननी समितीने (Screening Committee) सकारात्मक शिफारस केल्यानंतर चार प्रस्तावापैकी एक प्रस्ताव विद्यापीठाकडे, एक मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) नांदेड विभाग, नांदेड यांना व दोन प्रस्ताव संबंधीत महाविद्यालयास परत करावेत.

‘ज्ञानतीर्थ’ विष्णुपुरी, नांदेड. §
जा.क्र.शैक्ष/मान्यता/कॅस/०२/२०२२–२३/११०९, §
दिनांक : १२/०१/२०२३ §
§

उपकुलसचिव
शैक्षणिक (मान्यता) विभाग

<u>प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव:</u>

१) मा.प्राचार्य, सर्व संलग्नीत अशासकीय अनुदानित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.
२) मा.प्राचार्य, विज्ञान महाविद्यालय, स्नेहनगर, नांदेड.
३) मा.प्राचार्य, बी. रघुनाथ महाविद्यालय, परभणी
४) मा.प्राचार्य, राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
५) मा.शिक्षण सहसंचालक, (उच्च शिक्षण) शिक्षण सहसंचालनालय, नांदेड विभाग, नांदेड.
६) सिस्टीम एक्सपर्ट, शैक्षणिक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ, यांना प्रत देवून कळविण्यात येते की, सदर परिपत्रक विद्यापीठाच्या संकेत स्थळावर प्रसिध्द करावे.